चि. विनायकास लिहिलेल्या पत्रावरून बाकी हकीकत कळून येईल. आपल्यास लिहावयाचे ते एवढेच कीं आपणाकडून कांहीं पत्र नाहीं. अतिशः आपण जी पत्रें लिहितां ती फिरून वाचीत नाहीं किंवा विनायकास दाखवीत नाहीं असें दिसतें. पत्रानंतर तें पुनः पुनः वाचावें म्हणजे चुका सुधारतां येतात तेणे करून आपली भाषा व अक्षर सुधारतें. आज तागाईत ज्या ज्या वेळी आम्ही सतत बोलत आलों आपण चुका सुधारत नाहीं याचें कारण तरी हेंच कीं दुसऱ्यांनी सांगितलेलं बिलकूल ऐकावयाचें नाहींच. मी इतकें ओरडलों तरी आपण वीटकड्या देऊन वाचीत नाहीं हें एक व निरीक्षण करीत नाहीं हें दुसरें. असो; आपली मर्जी. आम्ही तरी किती सांगावयाचें.

चि. कावेरीसही कसें लिहावें हें शिकवावें. तिला कागदाचा एक फाटका तुकडा न देतां अर्धा कागद द्यावा पोस्टकार्ड बरोबर पाठविलें. गंगूताई, कावेरी मी स्कूलमध्ये आहे हें तुम्ही फार उपयोगी पडलां. रयांगांत ठेव. (माझा हरिभाऊ सांग. गणू अभ्यास.)

असो. सोबत पाठविलेले पद माझ्या पद्यांच्या पुस्तकांत लिहून ठेवावें. आपल्यास म्हणतां येत असल्यास म्हणावें. "धाटी" "माहेरची राजाची कन्या सगुण रूप स्वामी" अशी आहे. आणखीन पदें केली आहेत ती वेळ नसल्यामुळें लिहून काढलीं नाहींत. सवडीनुसार एखादें दुसरें पाठवीत जाईन.
चि. सौ. बाईनीस व पिऊ बाळूस शि. सा. न. - नारायण

व त्यावर प्रत्येक शब्द दूर दूर लिहण्यास सांगावे. आपल्यास समजत नसेल तर विनायक आहे व शेवटी चि. राम आहे त्यास विनाराव व त्याजकडून शिकून घ्यावे. असार. सावकाश लिहीण्यास आंही वेळ लागणार नाही. तिला कागदही दोन दोनदा तिजकडून वापरावा आणि नंतर पत्र बंद करावे. (आजा तुम्ही काय म्हणाल हे मला माहीत आहे.) वाचन कसे चालले आहे? लिहेण तीन पाना-पर्यंत आतां त्यास झाले पाहिजे कारण घरांत चि. सीताबाई, चि. आवरी व उभयतां वडील मनुष्यें आहेत अर्थात आपल्यावर कामाचा बोजा पडत नसेल हे निर्विवाद आहे. आज १५ दिवसांपूर्वी "काम आहे लिहावयाला होत नाही" म्हटले असते तर शोभले असते" आतां मात्र निदान ६-७ पाने झाली पाहिजेत एवढेच नव्हे तर पुस्तकेही वाचली पाहिजेत. क्षमा चालणार नाही. ता. २० जानेवारी १९१३ पासून ४ फेब्रुवारी पर्यंत किती लिहिले ते कळवावे. पत्राचे उत्तर जरूर. ति. गं. वहीनीस व ति. गं. पिऊताईस शि. सा. न. वि. करणे. आपला नारायण

पत्र तीन
शनिवार — ता. १ २/१३

चि. आवरीस अनेक आशीर्वाद विशेष:—

आपणाकडून पत्र नाही. चि. गंगूताईस लिहिलेल्या पत्रा-वरून तूं कसे करावेस हे कळले असेल. मी सांगित-ल्याप्रमाणे तूं करत असतेस की नाही हे मला उलट टपाली कळू दे. पत्र स्वच्छ अक्षराने दूर दूर लिहीत जा. पुस्तके वाच. वाचन आणि लेखन सोडू नको.

॥ १० ॥ श्रीगुरु ॥

[illegible]

९८ हेमचंद्र नस्कर स्ट्रीट
बऊबझार
कलकत्ता
ता. ८-२-९३
शनिवार

चि. गं. रत्ताईस अनेक आशीर्वाद विशेष: — आज [illegible]
पर्यंत तुम्हाकडून — किंवा कोणाकडून — पत्र नाही [illegible]
सांगितले असतां असें कां बरें व्हावें? अशी काय [illegible]
आली की पत्रं सुद्धा लिहावयाला तुम्हां सर्वांना वेळ
मिळत नाही? नशीब माझें की मला — देवाने मला
अशाकरिता जन्माला घातले. संकटे सोसावी, दुसऱ्याची
काळजी करावी व स्वतः गुरुबंगाल होऊन मरून जावें.
चि. रामूची प्रकृती स्वस्थ कशी आहे. कृपाकरून त्याच्या
प्रकृतीबद्दल आपण तरी कळवावे. त्याला पत्रे लिहाव-
याला वेळ मिळत नाही.

आपल्याला पुस्तके पोंचली असतीलच. सिरपेंबा
मिळाल्या ना? बाकू मी आणीन.

चि. विनायक व बाळू यांचा अभ्यास — धार्मिक
कृत्ये व इतर कार्ये कशी होत असतात हें लिहून कळवावे
सविस्तर हकीकत असू दे. चि. विपीन व अरविंद कसे
आहेत. चि. विपीनला काय काय शिकविलेस कळवावे.
जुनी पुस्तकें — मुंबईहून पाठविलेली — मिळाली कां?
असो पत्राचे उत्तर जरूर जरूर जरूर येऊ दे.
चि. गं. वहिनीस व चि. गं. पिंकु अक्कास माझा शि. सा.
नमस्कार आशीर्वाद कळवे

आपला [illegible]

॥ श्रीगुरु ॥ +० ॥

चि. कावेरीस :- अनेक आशीर्वाद तुजकडून पत्र नाही असें कां ? पुढील खेपेस न विसरतां तुम्हां कडून पत्र येईल अशी आशा आहे. कळावे.

आ.प.का. नारायण.

॥ श्रीगुरु ॥

८ प्रेमचंद बोराल स्ट्रीट
बहुबझार
कलकत्ता-१२

ति.गं. वहिनी व पिंकुअक्कास नारायणाच्या दोन्ही कर जोडून त्रिकाळ चरणी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना:—

आपलें चि. विनायकाच्या पत्रांतून आलेलें आणि चार पोंचलें. येत्या रेवेपंस ...जे ता २३ रविवारीं दोनप्रहरीं आम्हीं येथून निघून पुण्यास जाणार आहो. ति.रा.रा. गणु अण्णाचे लग्न ठरल्याप्रमाणे झाले असून ते येत्या महिन्यातच उरकून टाकण्याचा बेत आहे. एवढ्यासाठीं व मदतीला येत्या पाडव्याच्या मुहूर्तावर रवाना करावयाच्या असल्या कारणाने आम्हाला आता निघावें लागत आहे. अभ्यास संपत आला आहे.

लग्नासाठीं चार मुलीं सांगून आल्या व चारही फोटो आहे.

1) बालकोट पेंथीक गोदुबाई (कापडाचे दुकान)
यांची कन्या — (नांदसंत)

2) किसने एज्युकेशनल इनस्पेक्टर (मध्यभाग)
यांच्या भावाची कन्या पुणे (नापसंत)

काय तो सर्व खुलासा होऊन लवकर मुहूर्त ठरविण्याबद्दल मी तात्यास लिहिले आहे; कारण येत्या [सत्रिक] ८ तारखेस म्हणजे पाडव्यास (वर्षप्रतिपदेस) गदग येथे गणु अण्णा–तात्या साठीं दवाखाना सुरू करावयाचे ठरले आहे. परमेश्वराची कृपा व आपणा सर्वांचा आशिर्वाद एवढ्याच गोष्टीची अवश्यकता आहे. याकरितां उत्तर ताबडतोब धाडावे म्हणजे मला शनिवारींच पत्र पोंचेल. आपले पत्र आले नाहीं तर मला पुन: आदित्यवारचे जाणे सोमवार वर पडेल; पण मला पत्र पाहिजे पाहिजे. पत्रांत, चि. रामू, बाळू व चि. गंगूताई ह्यांच्या प्रकृती बद्दल कळवावे.

लग्नास बहुतेक आपणाला सोलापूरातील 'घरडी' गांवास पुरंदरा जवळ जावें लागेल तरी तयारीत असावे. काय काय करावयाचे तें मी पुण्याला गेल्याबरोबर आपल्याला कळवीन व शक्य असल्यास गणु अण्णाला तिकडे पाठवून देईन अथवा मी येईन. लग्नासाठीं व दवाखान्यासाठीं मी या खेपेस परिक्षेस न बसतां पुढें जून मध्यें बसण्याचे ठरविले आहे. असो. पुढील हकीकत नंतर

कळावें आपला नम्र व प्रिय

नारायण

14 (तुमचे मागील पत्र आदित्यवारीं संध्याकाळी पोंचले) Please write Gaade's address Laxman

My dear Vinayak Your's to hand just now. Am doing well. Please excuse for not sending the watch as promised. I am much in want of money & I will give it to you when you will come for Ganamama's marriage to the selected place. Write soon.

Your's N.H.

My dear Balu Nothing from you as yet. Sorry. Remember, you are to obey Ramu in every respect. You show him your diaries daily. Be ready for marriage.

Narayan

चि. गंगूताईस— विनायक म्हणतो तू आजारी आहेस! काय झालें आहे. लिहिण्यांत कसूर तर झाली नाहीं ना? माझे हातांचे दुखणे ज्यास्त झाले आहे. परमेश्वराची मर्जी. ओवरीच्या पतीचा नागपुरांतील पत्ता कळवा. मी बहुतेक तेथें उतरेन त्याला भेटेन. पत्र धाडलेच पाहिजे.

नारायण

चि. कावेरीस:— तू 'श्रीराम' लिहावयाचे सोडलेस हे फार वाईट केलेस. श्रीगुरुजी त्याबद्दल शिक्षा करील हे लक्षांत ठेव. केव्हांही देवाला लिहून पाठवावे तरच आपले चांगले होते.. असो. उत्तर धाडा.

आपला

नारायण

३) सोलापूर नजीक सांगोल्याजवळ घेरडी नावाचे एक खेडे आहे तथील इनामदार रा. रा. डोंगरे यांची कन्या — (पसंत)

४) कोल्हापूर येथील रा. हर्षे वकील यांची एकुलती एक कन्या — (नापसंत)

१ले स्थळ गरीब असून चांगले नाहीं. व मुलगीही चांगली नाहीं. दुसरें स्थळ बरें आहे पण रोगी आहे. ३रें स्थळ बरें असून श्रीमंत आहे. मुलगी सतेज असून चिं.सौ. सिताबाईच्या तोंडवळ्यासारखी आहे. काळी सावळी आहे परंतु शिकलेली आहे. ४थें स्थळ मुलगी बरी नाहीं. कारण एकुलती आहे. यांत ३रें स्थळच आम्हांला पसंत पडलें. कारण मुलगी हुशार, सतेज व घरांत मंडळी पुष्कळ. यांनी एका मनुष्यास येथें मुद्दाम पाठवून गजुअण्णास बघून घेतले. व आपले मत कळविलें. या मुलीचा भाऊ अमरावतीजवळ मामलेदार असून बाप म्हातारा आहे; तीन बंधु. एक वकील दुसरा शेतकी पाहणारा तिसरा पुण्यास शिकत कॉलेजात आहे. घरची मंडळी बरी आहे. त्यांनी आम्हांस असें विचारल्या त्यावेळीं आम्हीं १००० रुपये शिक्षणासाठीं देऊन बाकी सर्व तुम्हीं पाहून घ्या असें कळविलें. त्यावेळीं ५५० सांगितले होते. ते म्हणतात कीं ५०० रुपये घ्या व सगळा खर्च आपण पाहून घेऊं. पत्रिका जुळते आहे. फक्त रुपयाबद्दलच आज २० दिवस वाटाघाट होते आहे. येत्या आठवड्यात

16

पुणे ३०

७०९ नारायण पेठ

॥ श्रीगुरु ॥

शनिवार १ डि. ७३

चि. कमलाहिस अनेक आशिर्वाद विशेष :-

आपल्याकडे सर्व आलेले पत्र लिहिण्यास फुरसत मिळत नसावी असे दिसते, कारण आज अनेक महिन्यात आपणाकडून पत्र नाही. आणि आमची येक लिहिण्याची नेत्र नसल्यामुळे ही विशेष काही लिहित नाही. माझे दिसत. डाक्टर साठी आहे. हजामहूब. पुढे कळवीन

तुझे पत्र तयार आहे.

चि. सौ. कांतेस व चि. सौ. मीनाबाईस प्रेमपूर्वक आशिर्वाद कळवीन

घरचे अपल्यास नारायणाचे दाहतो

नारायण

मी काल दोनप्रहरी बारा वाजून तीस मिनिटांनी आलो. कुणकुणा मेंगळवारी संध्याकाळी ५½ वाजता सोडले.

~~२३~~ 17

२८ ~~...~~ बोरल स्ट्रीट
बाळबझार
कलकत्ता
शनिवार
तारीख २८ ६/१३

॥ श्रीगुरु ॥

दोन्ही कर जोडून मिळवी मस्तक
ठेऊन कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना:-

मागील पत्रें आपणास पोंचली असतीलच
त्यांत लिहिल्या प्रमाणे परिक्षा २३ तारखेस
म्हणजे सोमवारीच सुरु झाली. चांगले
लिहिले आहे.

ती.रा.रा. तात्यांनीही काय काय पहा-
वयाचें तें सर्व पाहून टाकले व तों आण-
खीने दोन दिवसांत काशीकडे जाईल. व
पुढें पुण्यास जाईल.

अशी परीक्षा आणखी आठ दिवस
चालेल. पुढें मी येथून निघेन. आणि
पूर्वींच्याच उद्योगास पुनः लागेन.

चि. ज्ञानेशीची प्रकृती कशी आहे?
बाकीची मंडळी बरी आहेत ना?

कळावे   आपला नम्र प्रिय
नारायण

६२३

शनिवार.

चि. मंगलताईस:-

तुझे पत्र वाचून मग तुला पत्र लिहीन. बाकी सर्व ठीक आहे.

तुझा

[illegible]

R. K. Shevade,

Shevade Tembe

Hubli

M. S. M. Ry.

~~34~~ 20

98 Premchand Boral
Street Bow Bazar
Calcutta.
Saturday | 28 6/13

My dear Ramu,

A week more for my exam is required as yet. Done well.

Tatiya will leave this place in a day or two for Kashi & thence Poona. He has seen almost all places of this place.

How is dear Kaveri & Arobind?

Nothing more.

Yours.
A.S.W.

Dear
Vinay alias Balu,

Will write you in detail after I receive from you tomorrow. Study & care for your health.

Yours affly
Narayan

श्री ॐ खडकी – दवाखाना

शनिवार ता-१२-५-१२

॥ श्रीगुरु ॥

ति.गं. वहिनी व पिकुअक्का – नारायणाचे दोन्हीकर जोडून त्रिकाळ चरणी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना:–

ठरल्याप्रमाणे आम्हीं गेल्या रविवारीं दुपारीं ३॥ वाजतां निघालो व गया काशी व प्रयाग येथें क्षेत्रविधी उरकून कालरोजीं मुंबईस जाऊन आज येथें आलो. येथें आणखीन ४ दिवस राहून मी दुबळीकडे येतो. बहुतेक सोलापुरास जाईन आणि तिकडे येईन. चि. अरविंद व विपीन यांची प्रकृती बरी आहेना? चि. कावेरी व गंगूताई कोठें आहेत कारण त्यांची पत्रें आज शनिवार असतानाही आली नाहींत – श्री. विनाय[redacted]चं बाळू राफेस जातात ना?

उद्यां चि. बापूची भेट घेऊन येतो. मुलांची पत्रें मला मंगळवारीं सकाळीं पोचलीच पाहिजेत अशा रीतीने धाडला कारण त्यानंतर मी येथें नाहीं. कळावें हे विज्ञापना आपला

नम्रे वाप्रिय

नारायण.

श्री मं

Dear Ramu,

Your's to hand this morning. Arrived here safe. Alright. Leaving this place on Wednesday morn — perhaps for Sholapur. Write before that.

-Narayan.

Dear

Vinayak.

Nothing from you. Why so? Write about your health & studies on monday morn so that I may receive on Tuesday morn. I will [illegible] tomorrow.

[illegible] [illegible] रामचंद्र नारायण

Narayan.

Dear Balu

Nothing from you. Why so. You ought to have written to me before this time. I am going perhaps to Sholapur on Wednesday. Write if to tell anything to Anna. & write his address. NB

98 Prem Chandra B.
Street Bow Bazar
"Sadguru" Calcutta 5 7/13.
Saturday

My dear Ramu

Nothing from you as yet. Recd from boys. Recd from Ganu anna. Alright.

My exam is finished. Done well hope to get success.

I am leaving Calcutta tomorrow by noon 2 o'clock train via Gaya, Kashi & Prayag. Tatya is still with us & he will also leave Calcutta once for all.

I am likely to reach Poona by Friday next so please write to that addr. Nothing more. Am well. My B.N's to dear Vahini & Pillu akka. Your's ever aff

Narayan.

My dear Vinayak

You will come to know from dear Ramu's letter. I am glad Mr. Jagalap

is to be appointed a teacher of your school.
How are you going on with your studies?
Take care of yr health. Nothing more
to add. Write to Poona 389 Narayan
Peth address, so that I may receive yours
on Friday or at the most Saturday morn.
My Best Namaskaras to dear Vahini & Pillukk.

Your's Affly.
Nanasaheb.

My dear Balu

Your's to hand. You will know every
thing from the above. I am sorry you
are suffering from itches. Take Sulpher
internally. Dr. Quadros or his assistant
Dr. Vinayak will give you if you tell
him my name. Be Taking care of your health
that is the most important thing.
Nothing more for the present. Write about
your health to Poona — 389 N. Peth
address.

Your's Affl.
Nanasaheb.

२८ प्रेमचंद बडालजी बोरळ स्ट्रीट.

॥ श्रीगुरु ॥ बाऊबझार कलकत्ता

ता. ५/१२ शनिवार

ती. गं. वहिनी व चि. कु. अक्का यांस दोन्ही कर जोडून त्रिकाळ चरणी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना.- आशीर्वाद पोहोचला. माझी परिक्षा संपली. बरी झाली आहे आणखी ८ दिवसांनी काय ते कळेल. आम्हीं उद्यां येथून निघून गया, काशी, व प्रयाग करून पुढें मुक्कामी जाणार. पुण्यास गुरुवारीं पोहोचूं. आपले पत्र तेथें यावें. पुण्याहून पुढें यावयास ८-१० दिवस लागतील असा अजमास आहे. पहावें. ती. रा. तात्या अद्याप येथेंच आहे. तेही उद्यांच निघणार। माझी प्रकृती बरी आहे. चि. अरविंद व बिपीन यांच्या प्रकृतीस असावे. कळावे हे विज्ञापना. आपला

नारायण

चि. मंगताईस अनेक आशीर्वाद:-

ठरल्याप्रमाणे पत्र लिहिले. देण्याचे उंडे व पिशव्या घेऊन येतो. काळजी नसावी. आपले लिहिणे बरोबर चालले आहे किंवा नाहीं? किती पाने रोज लिहिली जातात हें न विसरतां मला पुण्यास कळवावे. पुण्याहून कलकत्त्यास तिकडे येईन. चि. बावरी डर.

बरी आहे तर तिने पत्र कां लिहिले नाहीं ? कळवावे.
पुण्यास पत्र यावें. हे आशीर्वाद.
आपला नारायण.

चि. कावेरीस. अनेक आशीर्वाद:—
तुजकडून पत्र नाहीं तर असे कां ? पुण्यास
पत्र लिही. विसरूं नको.
नारायण.

कोल्हापूर शनिवार

"श्रीगुरु" ता ९-८-१३.

चि. गंगूताईस अनेक आशिर्वाद विशेष :-

काल सायंकाळीं ५॥ वाजतां मी येथें आलो. गुरुवार ता. ७ रोजीं दुपारी ११॥ वाजतां मी जमखंडी शहर सोडून रात्रौ ९॥ वाजतां मिरजेस आलो व शुक्रवारीच श्री अंबादेवीचे दर्शन घेण्याची उत्कट इच्छा झाल्याकारणानें (मी मिरजेचे काम सोडून इकडे काळच्या काळच आलो. ८। वाजतां (रात्रौ) श्रीचे दर्शन घेऊन पुन: स्टेशनकडे आलो कारण मी एका मित्राकडे शाहुपुरींत उतरलो आहे. खरोखरी कल्पनेनें एखादी गोष्ट करण्याचे व तीच जाणता झाल्यानंतर करण्याचे कितीतरी अंतर आढळून येतें. कारण मी कोल्हापुरची देवी लहानपणी पाहिली होती, आतां सर्व हिंदुस्थान व त्यातील प्रेक्षणीय स्थळें पाहून आल्यानंतर पहात आहे. तर यावरून मला हे आढळून आलें कीं या देवळासारखें दुसरें कुशलतेनें बांधलेलें देऊळ दुसरीकडे कोठेंही नाहीं. खरोखरी माझें मन अत्यंत आकर्षण झालें.

आजरोजीं सकाळ पासून मी माझ्या कामास सुरुवात केली आहे. पहावे काय होते तें. परमेश्वर आपला पाठीराखा आहे. आम्हांस काय ! त्यानेच जमखंडी येथील माझें काम तडीस नेलें व मला यश दिले.

अ २८

आज सायंकाळच्या आंत रा. ठाकूर व साकुरे यांजकडे जाऊन चवकशी करितो व शक्य झाल्यास व वेळ मिळाल्यास मी तारळ्यास जाईन.

येथून पुढें मी कुरुंदवाडास जाईन व तेथेंच वाडीस जाऊन दर्शन घेईन आणि नंतर एखादा दिवस मिरजेस रहून पुण्यास जाईन हें पत्र पोंचल्यानंतर दोन तीन दिवसाच्या आंत जर आपण पत्र धाडत असाल तर मिरजेलाच धाडावें. नाहींतर पुण्यास.

मागील रेल्वेच्या गडबडीमुळें माझ्या हातून जमखंडीस तिकीट न लावतां बंद केलेलें पाकीट पेटींत पडलें. मी मुद्दाम घातलें नाहीं. सध्यां मी भिक्षाच मागत हिंडत असून ती मिळतही आहे, असें असतां फक्त दोन पैशाकडे पाहीन असें आपणाला वाटतें काय? छे, तसें समजूं नये. भिक्षा मागितली म्हणजे कोणीतरी धाडतोच याचें उदाहरण खुद्द जमखंडीकरांनी मजकरितां (१०००) एक हजार रुपये दिले. ते मी धारवाडला पाठविले आहेत. हें श्रेय कळावें.

ति. रा. पिकु ठाकूर व वहिनींना शि. सा. न. व्यकिंट करणें.

चि. अरविंद व विपीन यांची प्रकृती बरी आहे ना?

आपला

नारायण.

२९

Dr.

N. S. Hardikar

M. C. P. & S.

~~Hubli~~ पुणेशहर

Dated १५-६-1913. शनिवार

To चि. गंगुताईस अनेक आशीर्वाद ~~वि~~ वि.

किर्डिच्यास वाईट वाटेल की आपणाकडून या

Sir,

आठवड्यात बिलकूल पत्र नाहीं असे कां?

मी आपल्या सर्वांच्या पत्राची वाट पहात होतो.

परंतु निराश झालो.

मला येथें येऊन तीन दिवस झाले आज

शनी मी मुंबईस जात आहे. तेथें चार दिवस

राहून परत येथें येईन व फक्त कांहीं तास राहून

सिरळ कोल्हापुराकडे जाईन. मला हुबळीस जाव-

याला अद्याप १५ दिवस तरी कमिष्ठ पाहिजेत. कृपा-

करून पुढल्या पत्त्यावर पत्र धाडावे.

ति. रा. चि. उ अक्कास शि. सा. नमस्कार सांगावा

करावा. चि. अरविंद व चि. विपीनची प्रकृती

कशी आहे? आपली ओम बरी चालली आहेत ना?

कळावे. : आपला नम्र

नारायण.

~~22~~ 30

Dr.
N. S. Hardikar
M. C. P. & S.

~~Hubli~~
मुंबई, ३२ चर्नी रोड
Dated 23-6-1913.

To चि. गंगूताईस नारायणाचे अनेक आशीर्वाद विशेष.

आपले पत्र मला परवा येथे मिळाले. मजकूर समजला.

Sir,

मुंबईस आल्यापासून माझी प्रकृती फार बिघडली असून या हवेस मी अगदी कंटाळलो. करितां आजरात्री अथवा उद्यां सकाळी येथून निघून पुण्यास जातो.

आज चि. रामूच्या नांवाने मी पांच पुस्तके V.P.P. करून पाठविली आहेत. त्यात १) प्रवासिनी, २) म[redacted]ा परिचय, ३) गाईचा मंडप, ४) विवेकानंद व्याख्यान ५) चि. शंकर करितां एक इंग्लिश पुस्तक असे आहे. पहिली चार आपल्याकरितां व बाकीच्यांना वाचण्याकरितां असून पांचवे शंकरला द्यावे. V.P. बहुतेक ३॥ रुपयाची असेल ती चि. रामूस घ्यावयाला सांगावी अगर तो नसल्यास आपण पैसे पाठवून द्यावी. परत बिलकूल करूं नये. महात्मापरिचय मी येईतों वाचून ठेवावे.

आपल्या काकू 'श्रीराम' किती लिहितात हे मला माहीत नाहीं पण लिहितात ही गोष्ट खरी. त्यांच्याकडूनच आपल्याला हकीकत कळेल.

सौ. मं. वहिनी परत कधीं येणार? गणेशचतुर्थीस तरी
येतील काय? मी स्वतः गणेश चतुर्थीस बहुतेक तेथें येईन
चि. अरविंद आतां कसा आहे कळवावे. याचे उत्तर
मिरजेच्या पत्त्यावर पाठवावे विसरूं नये.

ती. गं. चि. कु. अक्कूस शि. सा. नमस्कार कथन करावा.

आपला नम्र [illegible]

नारायण

Dr.
N. S. Hardikar.
L. M. C. P. & S.

Please accept money which you receive from ... family at Kop + keep in my account on my ... your shop.

~~Hubli~~
Port Said
Dated 29th Nov 1913.

32.

To my dear Ramu

Sir, I am today at the above named port of Egyptian Government. You will be in receipt of my letter from Aden on the 2nd or 3rd — if I am right — & of this on the 16th or 17th proximo. As stated in my last we left Aden on the 24th eve at 6 P.M. & arrived at Suez yesterday the 28th night at 10 P.M. Suez is a gate of entrance into the Suez Canal which extends from Suez to port Said — 87 miles in length. Steamers require 17 to 18 hours to travel the distance & the speed is only 5 miles an hour in the Canal. The history of the Canal is interesting & I wish to publish it in one Marathi & one Canarese papers of our day. So, I don't wish to spend my time now over it.

We are likely to leave Port Said this night at about 8 P.M & then proceed further to Marseilles which port we will reach on the 4th of Dec. Today we have left behind us Asia & some part of Africa. From Aden to Port Said we required 5 days & during that period we used to see the coasts of Asia & Africa. Really it is a beautiful scenery. Today we will enter the Mediterranean Sea of Europe.

Ramu, we are receiving no proper food on board the deck. You know that we wanted to cook ourselves but as we did not get proper place we left that idea totally & now we are paying 1/2 rupee daily per head to the Company & taking from them Potatoes, Bread, butter, & Coffee twice. That's all. I have no time to describe all. I will write in detail from Marseilles. Please await.

I am suffering from itches, & eczema my hand is full of them. I don't know what happens in future.

Nothing more. my B.N. to dear Vahini & B.C. s to all youngsters
Yours aff. Nana.

पोर्ट सेद.
तारीख २८ नो. १९२३

ती.सं. वहिनीस नारायणाचे दोन्हीकर जोडून त्रिकाळ चरणी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विनापना.

आपला नारायण आज ११ हजार मैलावर सात समुद्र ओलांडून आला आहे. त्याचे शरीर मात्र या ठिकाणी आहे पण आत्मा मुंबईस असून तुमच्याच सान्निध्यात आहे. सतत रात्र स्वप्न सृष्टीमध्ये मी तुम्हां सर्वांत बसलेला असून मजबरोबर माझी सर्व मुले अरविंद, विपीन, विनायक, बालू, शंकर, राजू इत्यादी बोलत बसली असून गंगूबाई, कावेरी, धा. इत्यादि जवळ आहेत असें दिसावयाचे दिसते. चि. गंगूताईस कितीदा (या १५-१६ दिवसांत) दुःख करताना पाहिले आहे. काय असेल ते कळेल. ती.सं. चिंतु अक्का आधार करणारी सौ. आहे का? मुलांची प्रकृति बरी आहे ना?

माझी प्रकृती बरी जरी असली तरी मला इकडच्या स्वरूपात रहाणी आहे व इथले वाटत आहे. मला एक दोन वेळ लागली होती पण त्यानंतर कोठीं त्रास झाला नाही. मजबरोबरच्या इतर मंडळींना मात्र युक्ती खाऊन (बोटीत असतां) उलट्या लागली आहे. त्यांना नकोसे.

आम्हांस जेवावयाला अलीकडे बटाटे, भात, कांदे, वरण, टोस्ट, कोफी व कोको इतके पदार्थ मिळत असून आमच्याबरोबरचे लोणचे, मसाला, चटणी, पापड व लाडू आणि वड्या हे फार उपयोगी पडतात.

याचे वर्णन मी तुम्हांला मार्सेल्सहून करेन.

३५

आतापर्यंत पांच दिवस आम्हांस समुद्रांत काढावे लागतील आणि पुढें ४ दिवस जमीनीवर राहून लगेच पुन: तेथून ८ दिवस समुद्र असा प्रवास आहे.

.. अस्तु. पुढील [illegible] [illegible]

आपला,
नारायण.

चि. गंगाधरास अनेक आशीर्वाद:-

वरील मजकूर पहा व पुढील पत्रांची वाट पहा. दरम्यान आठ आठ दिवसांनी मी पत्रें पाठवीत आहे. तुम्हीही त्याप्रमाणेच [illegible] [illegible].

मी डायरी लिहीत आहे ती इंग्लंडहून पाठवून देईन.

तुमचा
नारायण

Dear
Vinay etc. & Balu

Please await my detailed letter from Marseilles which will be posted from that place on the 6th Dec

I have kept my diary. I will send from London [illegible]

Nana

Has dear Shankar come! My B. to dear Shankar & Bapu

४ 36

कोल्हापूर शनिवार
ता. १३-९-'१३

चि. गंगूताईस अनेक आशीर्वाद विशेष:-

कामामुळें मला गुरुवार शुक्रवारच्या संधीस हुबळीस जाता आले नाहीं.

ठरल्याप्रमाणे द्वादशीचे दिवशी काय व्हावयाचे ते झाले असेलच. मला त्या समारंभास राहतां आले नाहीं याजबद्दल विषाद वाटतो.

ति. गं. वहिनी बहुतेक तेथें आल्या असतील. ति. गं. ताई आजच तारळ्यास गेल्या. मनकाईतां ४ दिवस ज्यास्त राहिल्या होत्या.

उद्ईक मी येथून निघतो. मंगळवारी पंचमी आहे. मी पक्ष करणार! भटाना सांगून ठेवावे. उद्या परवां जर हुबळीस गेलो नाहीं तर मंगळवारी सकाळी तेथें येवूच. ~~आपण~~ ति. गं. पिळुआक्का व वहिनीस पक्षाची तयारी ठेवावयास सांगणे. कळावे. ति. गं. वाईनीस व पिळुआक्का शि. सा. न. सांगावे.

आपला
नारायण.

1913 ~~17~~ 31

याकार्डच्या मागील बाजूस दिसणारे चित्र आम्हांस हिंदुस्थानातून विलायतेस घेऊन जाणाऱ्या आगबोटीचे आहे. नंबर ३ हा पुढला भाग या ठिकाणी तिसरा क्लास आहे. नंबर १ हा मधला भाग येथें खालपासून वर पर्यंत इंजिन असून त्याच्या आजूबाजूस १ला वर्ग आहे. नंबर २ हा मागचा भाग या ठिकाणी २रा क्लास आहे. या बोटीची लांबी रुंदी वगैरे अंदाज समजलें नाहीं. याचे वजन ६॥ हजार 'टन' म्हणजे २८ लाख मणावर असून याची शक्ती ६ हजार घोड्या इतकी आहे. तासाला १३ ते १४ मैलाचा प्रवास याच्या हातून होत असून बरोबर २४ तासांत ~~क~~ ३४० मैल जाते. ~~कधी~~ कधीं ३७० मैल पर्यंत ही जाते. या बोटीवर बहुतेक १०० खलाशी व बाकीचे अधिकारी असावेत असा अनुमान आहे. सध्यां बोटीवरील तिसऱ्या क्लासांत ३० ते ३५ उतारू; ३ऱ्या (डेकवर) क्लासांत मुसलमान प्रवासी आहेत. दुसऱ्या क्लासांत उतारू असून १ल्या वर्गात असावेत असें वाटतें. बोटीवर प्रत्येक तऱ्हेची व्यवस्था चांगल्या प्रकारची असून प्रवासी फार च मजेने प्रवास करीत असावेत. फ्रेंच बोटी सारखी व्यवस्था दुसऱ्या कोणत्याही बोटीत नसते असें ऐकिवात आहे. या कंपनीच्या सर्व बोटीत ही बोट मोठेपणात दुसरा नंबर पटकावेल असें वाटतें.

CARTE POSTALE

ADRESSE

[1913] ~~49~~ 38

मार्सेल नामक युरोपीय
बंदरा नजीकच्या दर्यांत
ता. ४ प्रातःकाळ

॥ श्रीराम ॥

ति. गं. वहिनीस नारायणाचे दोन्हीकर जोडून
त्रिकाळ चरणी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना:-
आपला निरोप घेऊन निघाल्याला आज २८ दिवस झाले. या २८ दिवसांत मी आपल्याला बरीच पत्रें घातली असून एडन व पोर्ट सैद या दोन बंदराहून मराठी खुशालीची पत्रें लिहिली आहेत. वहिनी, माझी सर्व हकीकत तुम्हांला कळावी अशी तुमची इच्छा असेल नव्हे? होय, असणे साहजीक आहे, आणि ती तृप्त करणे हे माझें काम आहे. परंतु, लंडनहून मी माझी रोजची डायरी पाठविणार असून त्यांत सर्व कांहीं आलेले असल्यामुळें, पुनः येथें लिहावे असे मला वाटत नाहीं. तरी तुमच्या साठीं थोडथोडी कुठची हकीकत आतां देण्याचा विचार केला आहे.

हुबळीहून मुंबई जवळजवळ ६०० मैल जमीनीचा प्रवास
मुंबईहून एडन बंदर १६५८ मैल दर्याप्रवास
पुढें तसाच एडनहून सुएजकालव्याच्या नाक्या १३१२ मैल दर्याप्रवास
तेथून सुएजचा कालवा (अकुंचित) ८७ मैल पोर्टसैदपर्यंत
पोर्टसैदपासून मार्सेल नामक फ्रेंच बंदर १५१० मैल असें
एकूण ५१६७ मैल. यावेळा-
पासून लंडन ८॥ शें मैल असावे. अमेरिकेपर्यंतचे मैल नंतर देईन.
सध्यांतर पांच हजार मैलाचा प्रवास केला असून या प्रवासांत मला

5 39

३

अभिवचन दिले आणि हुकूम पाठविला. तेंव्हां पासून आमच्याच मसाल्या घात

लेली आमटी, त्यांत केबिज घातलेले, बटाटे, भात, रोट व कॉफी इतके

पदार्थ दोन वेळ मिळूं लागले. नंतर आमचे तांदूळ व डाळ संपली तेंव्हां

बयरामाची अथवा केबिजची भाजी चावी, फळें चावीत, भात, रोट, व

कॉफी इतके पदार्थ मिळूं लागले. व शेवटपर्यंत तेंच मिळत राहिले.

हें पदार्थ एका अरबाने (मुसलमानाने) करावे आणि ते वाढण्या इंग्रज

लोकांनी आणून ठेवावेत असें चाललेले असते. एक लांबच लांब टेबल

त्यांवर पांढऱ्या फुलांचे तांबडे कापड आंथरलेले. व सर्व जिन्नस त्यावर आणून

ठेविलेले असत येतील तसें आपणच घ्यावयाचे. एक चमचा, फुल

कोय व एक सुरी इतके साहित्य असून बशा, कप वगैरे ठेविलेले

असतात. पदार्थ नुसते पाण्यात घालून शिजविलेले (उकडलेले) असतात. आम्ही

पत्र्याच्यांत मीठ घालावयाचे, मसाला घालावयाचा व खावयाचे.

आमच्याजवळ तूप होते. तूप, लोणचे, पापड, चटणी इतके सगळे

पदार्थ घेऊन जाऊन त्या काट्या चमच्यानीच आम्ही जेवीत असूं.

आम्ही शाकाहारी सहाजण सर्व हिंदू. आमच्या खोलीतही ८ जण

हिंदू असून एक तुर्की मनुष्य होता. सर्व चांगले व जेवणाराही

आम्हीं एका टेबलावर बसत असूं. मांस खाणारेही आम्हांला

लागूनच बसतात. पण निरुपायाने तिकडे न पाहतां आम्हांला

आमचा भात, आमटी खावी लागते. आम्हांला पाहून ते लोक हंस

तात ही कारण आम्हीं भातखाऊ व ते मांसाहारी. कसेंतरी मांस

ला न शिवतां जेवण करावे लागते. या गोऱ्या लोकांना जेवणाची

-रुपी नाहीं असें मोठ्या कष्टानें म्हणावे लागते. हिंदुस्थानांत आपल्या घरीं नवताळलेली आमची जीभ त्यांच्या अन्नाचा अतिशय तिटकारा करित. वहिनी, हिंदुस्थान सोडल्याबरोबर मला माझा एक नियम मोडावा लागला आणि तसें करताना परमेश्वराला मागून केले. तो नियम कोणता म्हणाल तर स्नान न करितां खाणे. बोट लागण्याचा संभव असूं लागल्यामुळें मला खावेंच लागलें. मी मुक्कामी गेल्यानंतर माझा निश्चय पुनः कायम करीन. बाकी स्नानतर रोज करीत होतो. परंतु दुपारीं दोन वाजतां कारण एकच खोली त्यात ३५-४० लोक स्नान करणारे. आम्हांस दुपारीच रिकामी आढळे. स्नानगृहांत एक दगडाचा मोठा टब असून त्यांत दोन मोठाले नळ सोडले आहेत. या टबला खाली एक भोंक असून त्याचे पाणी समुद्रांत जाते. दोन्हीं ~~नळाला~~ नळाला समुद्रांचे खारें पाणीच असून एकांत थंड व ऊन असें असे. वाटेल त्याने वाटेल तितके वाटेल तें पाणी घ्यावें. व नंतर गोड्या पाण्याने (हें बादलीनेच न्यावे लागते) स्नान करून स्वच्छ व्हावे लागत असे. या ठिकाणी माझी एकदा फजीती झाली. ती ही कीं मी गोडे पाणी न घेतां तसाच आंत जाऊन खाऱ्या पाण्याने स्नान केले. पण सर्व चिकट झाले म्हणून पुनः गोड्या पाण्याने स्नान करावे लागले. गोरे लोक शौचास गेल्यानंतर पाण्याने पृष्ठभाग धुवत नाहींत तर कागदाने पुसतात आम्हांला पाणी नेताना पाहून ते हंसतात. एकदां म्हणजे तारीख ३० ला समुद्र अतिशय खवळला होता त्यावेळेला आम्ही सबंध दिवस अंथरुणावर पडून राहिले व कोणीही कांही खाल्ले

२ ६०४१

मुंबईला विशेषसे सौख्य झाले नाहीं. कारण जेवण तर खाणावळीचें, अर्थात आमच्या विरुद्ध. ता. १८ ला मुंबजेबोटीत बसावयाच्या दिवशी मला जेवण तर मिळेल नाहीं. नाडगीर येईतों पर्यंत, नाडगीरची काळजी सारखी जागत होती. सामान मुक्त घ्यावयाचें व आलेल्या सर्व मंडळींना संतोषवावयाचें इतकी ओझें मजकडे होती. पैकीं सामानाची सर्व जबाबदारी चि. रामनें आपल्याकडे घेतली म्हणून मला त्रास पडला नाहीं. नाडगीर उशीरा आल्यामुळें त्यालाही त्रास झाला व मलाही येथें त्रास होत आहे. बोटीत बसल्यानंतर जेवणखाणाचें कसें होईल, बोट लागेल कीं काय, या काळज्या. आम्हांस बोट म्हणजे काय व तेथें कसें वागावें, हें माहीत नसल्यामुळें पहिल्या दिवशी तर उपवासावरच दिवस काढिला. स्वयंपाक करून खावयाचा असा बेत असल्यामुळें सर्व साहित्य बरोबर घेतलें होतें; पण स्वयंपाकाची जागा गुरें अडकवून कॉटे सोडत ज्याठिकाणी बसतात तेथें असल्यामुळें आम्हांला किळस आला व त्यांच्याकडूनच जेवण घ्यावयाचें ठरविलें. एवढ्याकरितां 'जेवणाशिवाय तिकीट' काढलें होतें. नंतर प्रत्येकाला रोज १॥ रुपया जेवणाकरितां द्यावयाचें ठरवून उकडलेले बटाटे, टोस्ट, लोणी, आणि कॉफी इतके पदार्थ फक्त दोन वेळ घ्यावयाचें ठरविलें. त्याप्रमाणें ५-६ दिवस त्यांवर व घरच्या लाडवावर काढले. त्याचा कंटाळा आला. टोस्ट पचेनात, लोणी वाईट तेंव्हां मीच मुख्य अधिकाऱ्याकडे गेलो आणि आमच्याकडे तांदूळ, डाळ आहेत आम्हांला शिजवून द्या नाहींतर चांगली जागा स्वयंपाकाकरितां द्या अशी विनंती केली. तेंव्हां त्यानें आम्हांस शिजवून देण्याचें

डि. तारीख ३ प्रात:काळ

॥ श्रीराम ॥

सिसिली व मार्सेल यांमधील
मध्य समुद्राचा भाग.

चि. बाळुस अनेक आशीर्वाद विशेष:-

मला क्षमा कर, इतालतले पाकीट पाठवून देतो म्हणून सांगितले असताना सुद्धां पाठविले नाहीं ही माझी मलाच लाजिरवाणी गोष्ट होय. कारण ॥ बोले तैसा चाले त्याची वंदावी पाउले ॥ अशा तत्वाचा मनुष्य मी असताना ठरल्याप्रमाणे तुझी तृप्ती केली नाहीं हें महत्पाप होय. वेदांत अशा पापाचा प्रायश्चित सांगितले आहे तें हें कीं एक पश्चात्ताप आणि दुसरा दंड. मला दंड देण्याची शक्ती नाहीं म्हणून मी पत्र-द्वारे पश्चात्ताप प्रदर्शित करून तुझी क्षमा विचारीत आहे.

माझ्यापेक्षां तू लहान परंतु तें लक्षांत न आणतां मी तुझी विनवणी करीत आहे यावरून तूं फुगून जाऊं नको. आणि तुला तितकी योग्यता आली म्हणून माझ्या सारख्या वडील मंडळीशी बेमुर्वतीने वागूं नको. कारण खरोखरी तुझी योग्यता तितकी नाहीं. लहान म्हणून लहान राहून फार चांगले हुशी होण्यांत मजा नाहीं.

मजजवळ खर्च करावयाला पैसे नव्हते. जेवढे होते तेवढ्यांतच मला व्यवस्था करावी लागली. नाहीं नाहीं म्हणतां मुंबईला माझे २०० रुपये खर्च झाले तरी पुष्कळ सामान घ्यावयाचे राहिले.

पैसे फार खर्च झाले म्हणून बुटे पाकीटच मला बरोबर आणावे
लागले. विनायकाची मोठी ट्रंकही माझ्याबरोबर पाताळांत
पडली आहे. यावरून काय समजावयाचे तें समज.

ति.गं. पिलुअक्कु व ती.सौ. मावशी यांस निराळे पत्र
या गावाहून लिहिण्यास अवकाश नाहीं करितां 'मुंबईहून
निघाल्यापासून १८ व्या दिवशीं सकाळीं मी युरोप मधील
फ्रान्स देशाच्या किनाऱ्याचे मार्सेल्स नामक बंदरास सुखरूप
येऊन पोंचलो व तेथे दर्याप्रवास संपला, पुढें लंडनला जाऊन
तुम्हांला निराळे पत्र लिहीन' अशा अर्थाचे पत्र स्पष्ट
अक्षरांत तूं त्यांना (केशवमास्तरांकडे) लिही व माझा शि.सा.
न. प्रविष्ट कर.

तूं तुझ्या सर्व मित्रांना माझा नमस्कार सांग व माझा
निरोप कळीव कीं मुलानो - तुम्ही सशक्त व्हा, धैर्यवान व्हा,
व या जगांत पाहिजे तें करण्याची धमक आणा. मातापितरें, बंधु
भगिनी व आपला देश यांवर आपल्या स्वतः प्रमाणे प्रीती करा.
म्हणजेच तुम्हांला सुख मिळेल. अस्तु

तूं जी मला पत्र लिहिशील ती इंग्रजींत न लिहितां
आपल्या मातृभाषेच्या लिपीत लिहावयाची व फार चांगली
अक्षरें काढावयाची. तुमची पत्रें १० हजार मैलांवर जावयाची
असून पुष्कळ दिवस रहावयाची आहेत. फार विचारपूर्वक व
स्पष्ट लिही. कळावे हे आशीर्वाद आपला

नाना

~~अ~~ 44

Dr.
N. S. Hardikar
M. C. P. & S.

~~Hubli~~
पुणे शहर
Dated 12-नोव्हेंबर 1913.

To चि. गंगूताईस अनेक आशीर्वाद विशेष :-

Sir,

तुमचा निरोप घेऊन निघालो तो येथे सुखरूप
येऊन पोचलो. चि. विनायकाला दिलेल्या पैशाखेरीज
बाकी सर्व हकीकत कळेल. आता मला विशेष जरी
काही काम नाही तरी कंटाळा आला आहे आणि म्हणून
मी तुला मुंबईहून निघण्याचे आश्वासन देतो. पण
तत्पूर्वी हे पत्र पोचल्याबरोबर तू मला एक पत्र
मुंबईच्या पत्त्यावर लिहीत जा. अशी अपेक्षा आहे.
प्रकृतीची काळजी घे आणि आपला वेळ वाचन
करण्यात व सत्कार्य यांच्यामध्ये ज्यास्त जाईल
अशी व्यवस्था कर आणि बरोबर आजच्या दिवसाचे
माझ्या पुस्तकांत नोंदी ठेवीत. पुढे पत्रे कोणत्या
दिवशी लिहावयाची ते कळवीन. आता माझा
रविवार ही मेल आणि तुझा बुधवार ही नेमाचा
दिवस ठरवावयाचा आहे.

हे. या पत्रापासून तो मी परत मुंबईला
भेटतो पर्यंत आपण सर्वांनी माझी पत्रे संभाळून
ठेवली पाहिजेत. इंग्रजी असोत वा मराठी असोत
लोकांना ... शि. सा. नमस्कार विदित करावा
आपला कल्याणाकांक्षी नारायण

ति. गं. कार्निस प्रेमपूर्वक निंबाळी शिरसाष्टांग
नमस्कार विशेष. विनंती.

आपला निरोप घेऊन निघालो तो येथे आज सकाळी आलो. रा. नाडगीर काल स्टेशनवर भेटले होते. तथापि आपल्याला भेटले असतील तर आपण त्यांस सर्व हकीकत विचारलीच मला यावेळला पत्र सुद्धां धाडविले असेल. त्यांच्याबद्दल मला फार चिंता लागली असून त्यांच्याने पुढले सर्व आयुष्य नाश पावेल असें वाटून हळहळ वाटते. काय करावे ? सुचत नाहीं. कृपा करून आपण जर परत येतील तर पुनश्च त्यांस ~~स~~ समजावून सांगावे व लवकर येण्यास सांगावे. मी शेवट पर्यंत त्यांची वाट पाहीन आणि नंतर तारीख १६ अथवा १७ ला त्यांची आशा सोडून गप्प बसेन. मी परमेश्वराला स्मरून त्यांच्याबद्दल अंतःकरण पूर्वक काम करीत आलो व पुढे करेन पण त्याच्या त्याने स्वीकार करावा. असो. मिळाले उत्तर [illegible] [illegible] मुंबईच्या पत्त्यावर धाडावे. आपला नम्र विनीत

नारायण

~~42~~ 46

Dr.

N. S. Hardikar

M. C. P. & S.

~~Hubli~~ Bombay

Dated. 19 Nov 1913.

To

Sir,

चि. गंगुताईस अनेक उत्तम आशीर्वाद :-

~~आज~~ इतके दिवस म्हणत असलेला दिवस आज
उगवला हे पाहून मला फार आनंद झाला. परंतु या
आनंदाच्या भरांत माझ्या मातृभूमीचा विरोध येणे जरी
माझ्या जिवावर येत नाहीं तरी आता अडखळून येत
आहे. मनुष्याला बडबड रगड करितां येते पण वेळ आली
कीं त्याच्या हातून कामे होत नाहींत तशीच कांहीं अंशी
माझी गत झाली आहे. तुला ~~व~~ सर्वांना सविस्तर
हकीकतीचे पत्र पाठवावे म्हणून करीत म्हणत होतो पण
दिवस उगवला - निघण्याची वेळ झाली - तरी मला फावत
नाहीं हे पाहून वाईट वाटते. ~~व~~ हिंदुस्थान सोडण्यापूर्वी
पूर्वी थोडीतरी मनाला विश्रांती मिळावी म्हणून बरीच
खटपट केली पण व्यर्थ गेली ते. मला या चार
दिवसांत झोप सुद्धां मिळाली नाहीं. त्यावेळीं नवें
तर जी कामे अवश्य होती ती कामे सुद्धां करवली नाहींत
नेहमी प्रमाणे कामाचा बोजा माझ्या शिरावर पडावयाचा
तोच पडला व मला खपावयाला लागले ते
लागलेच. रा. नाडगीर येथें परवा दुपारीं २
वाजतां आले. तो पर्यंत आम्ही दोघांचे सर्व सामान
आणले होते. पण ते आल्यानंतर पुनः त्यांचे सर्व
सामाना करितां तीन चार हेलपाटे पडून दुपार फुकट
गेली. असो जगांत असे हे चालावयाचेच -

~~४३~~ 47

आमची बोट आज सकाळी येथे आली व आज अवं-
घ्याची आम्हांस सांगण्यात आले कीं "उद्यां (म्हणजे
आज) १०। वाजतां बोटीवर परिक्षेकरितां जावयाचे असून
बोट १२ वाजावयाचे आंत मुंबई बंदरांतून बाहेर पडाव-
याची आहे. करितां वेळ न गमवितां तुम्ही हजर रहा"
आमची बरीच तारांबळ उडाली. चि. राघु मजबरोबर आला
म्हणून फार बरें झालें. त्याच्याकडून मला अतोनात सहाय्य
झालें त्यानेच माझी सामान सुमानाची व्यवस्था केली
म्हणावयास हरकत नाहीं. आणि या एक दोन मंडळींच्या
सहाय्याने आज माझें अर्धे 'लगेज' (सामान) बोटीवर
गेलें. आणि आज बाकी जाईल.

नाहीं नाहीं म्हणतां सामान इतकें झालें कीं मोठ्या
मोठ्या अशा चार ट्रंका भरपूर भरल्या असून
त्याशिवाय अवांतर बोचकीं ८-१० आहेत.

अस्तु. सध्यां वेळ नाहीं. कृपाकर

आता [illegible] अगदीं फुरसत
पत्र लिहीन त्याची वाट पहा.
नाहीं. एडनहून सविस्तर
तू उत्तर डाकेनें एडनच्या पत्त्यावर पत्र पाठव.
[illegible] मी आज
चि. अरविंद. चि. बिपीन यांना सांग कीं
भारत देश सोडून शिक्षण संपादण्यासाठीं परदेशी चालले
ति. गं. वहिनीस माझा अत्यंत प्रेमपूर्वक [illegible] शि. सा.
न. प्रविष्ट करावा. [illegible] आहे म्हणून सांगावे.

आपला नम्र प्रेमाकांक्षी
नारायण

~~४४~~ 48

चि. विनायक व बाळ यांस :- कृपा करा
कृपा करा. मला वेळ नाहीं मी एडनहून
सर्व हकीकत लिहीन. सध्यां वेळ नाहीं.

आपला नारायण

आमच्या सर्व देशबांधवांस — कीं जे जे मज
बद्दल विचारतील त्यांस नमस्कार अवश्य
सांगावा

नारायण

~~18~~ 49.

Dr.
N. S. Hardikar
M. C. P. & S.

~~Hubli~~
Bombay, Girgaon
Dated. 19th Nov. 1913.

To my dear Bapu

Sorry, Intensly sorry not to see you Sir, personally at Hubli, Dharwar or Bombay ~~to~~ & no neither a single line on a card. Really surprising it is that you did not turn to Hubli on the date once settled. I am given to understand that you left Bombay on the 7th & you were at ~~Bombay~~ Dharwar on the 10th. If you had come direct to Hubli I wd have seen you easily at least at a moment when I wanted to go so far from you all. Never mind! I shd not feel of sorry for that now. Done is done. Will you be kind enough to write me to my London address given on some other page & satisfy me? I have a mind to see & ~~am~~ very eager to see a single line ~~only~~ atleast from your pen. Be pleased to do so. I have no time to write more. I am off today. I am desperate. I am hazarding my life.. God is great I know, he must help me.

Dear Ramu leaves this tomorrow.

Educate your youngsters, bring them forward I need not tell you about it. Please write by the very return of mail, for Foreign mail leaves Bombay on Saturday at 2 P.M. nothing more

NSH

+4 50

~~Hubli~~

Bombay Coll's Mu

2051

विलायतेची पत्रें शनिवारीं न जातील तर पुन: ८ दिवस ती तशीच मुंबईस पडून राहतात. आणि पुन: दुसऱ्या शनिवारीं निघून जातात. म्हणून मी एक पत्र मुद्दाम खरडून तुम्हांला ताकीद करतो कीं तुम्ही दर बुधवारीं रात्रीं पत्र लिहून गुरुवारच्या १२॥ च्या मेलला टाकलेंच पाहिजे म्हणजे शनिवारच्या आंत सर्व तयार होतें. अगदीच जरूर तार असेल तर शुक्रवारीं पोस्टात (१२॥) घाला पण बाकी सर्व साधारण असतील तर गुरुवारीं पडलींच पाहिजेत.

मजकडून आपल्याला प्रत्येक मुक्कामाहून एक सविस्तर हकीकतीचें पत्र जाईल. आपण ती वाचून नंतरच्या तशीच ठेवावीत म्हणजे पुढें त्याचा उपयोग होईल

आपणास पत्र लिहावयाला एखादा दिवस उशीर लागला अथवा पत्र लिहिले नाहीं तरी आपण आपला गुरुवारचा दिवस मात्र चुकवूं नका. पत्रें लिहिणे ती स्पष्ट, स्वच्छ अगर मातृभाषेत लिहा. इंग्लिश लिहूं नका. याला दोन चार कारणें आहेत. असो.

हा पैठ्याचा कागद आहे. जपून ठेवा

बाबा

चि. विनायक, बाळ व गंगूताई हरितां — श्री 59.

पत्रासंबंधाने माहिती:—

मी अमुक एका गांवी जाऊन पोंचेलो पर्यंत व आपणास नक्की पत्ता कळे तों पर्यंत आपण खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा

To Dr. N.S. Hardikar M.C.P.S.
C/o Thomas Cook & Son
Ludgate Circus
London

मी लंडनमध्ये फक्त ४ दिवस थांबेन त्यानंतर पुढे जाईन ~~नंतर~~ म्हणून आपण एकदोन पत्राची उत्तरे तेवढीच लंडनच्या पत्यावर पाठवावीत व बाकीची न्यूयॉर्कच्या पत्यावर पाठवावे. अथवा ता. ८ डिसेंबर पर्यंतची पत्रें लंडनच्या पत्यावर येऊद्येत व नंतर न्यूयॉर्क.

न्यूयॉर्कचा पत्ता:—

To Dr. N.S. Hardikar M.C.P.S.
C/o Thomas Cook & Son
245, Broadway
New York
U.S.A.

लंडनच्या पाकीटाला १ आण्याचे तिकीट लागते. न्यूयॉर्कला मात्र प्रत्येक पाकीटास २॥ आणे पाहिजेत.

मुंबईहून टपाल नेणारी आगबोट फक्त एकदाच विलायतेला जाते. आणि तेही शनिवारी. मुंबईहून जर

३५ ५३.

पुणें - तारीख २४ ११/१३
प्रातः ८ वा

चि. गंगूताईस अनेक आशिर्वाद :-
सोमवार

मुंबईहून धाडलेलें पत्र तुला पोंचलें असेलच. आणि आतां बहुतेक चि. रामुही डुबळीस पोंचला असेल आणि त्यानें माझ्या बद्दल सर्व हकीकत सांगितली असेल. चि. रामुनें मला अत्यंत सहाय केलें. तो नसतां तर मला या खेपेस मुंबईस फार त्रास पडला असता असें मला वाटू लागलें आहे, कारण माझी सर्व मंडळी तुला माहीत आहेत कीं फार आळशी होत. असु आज २० वर्षें तुम्हां सर्वांत मिळून असणारा तुमचा नाना आज परदेश गमन करीत असून त्याने आपला डाव साधला व हद्द गाठविली. तूं तुझ्या नानाला "चंचळ मनाचा" म्हणून अजून ही जर म्हणशील किंवा दुसऱ्यानें म्हटलें तें ऐकशील तर माझें दुर्दैव म्हणावयाचें.

गंगूताई, मी जरी प्रवासात आहे तरी माझा आत्मा तुझ्याजवळ आहे हें आज मी तुला लिहून कळवीत आहे. चि. सौ. सिपू व ताल्याची बायको या दोघीही माझ्या आगबोटीपर्यंत मला पोंचवावयाला आल्या होत्या त्या वेळीं खचित मला तुझी आठवण झाली व मी तुला सर्व हकीकत कळवावयाला त्या दोघीस ही विनविलें. 'मुंबईला येतीस कां' म्हणून विचारलें तरी तूं त्याला उत्तर दिलें नाहींस, अर्थात ति. गं. वहिनीनाही तें पसंत पडलें नाहीं. पण मला फार वाईट वाटलें. निरुपायानें स्वस्थ बसावें लागलें.

नाना

कोंबड असेलको दुसरी चित्रें तुम्ही स्वतः पहा व छापखान्यातून मकुण्ड जर आला तर त्याला द्या अथवा विनायक किंवा बाळू बरोबर पाठवा. तुम्हांला हा संदेश एक प्रवास्याबद्दल मी त्याला लिहिलें आहे.

मी परत हिंदुस्थानांत येईन त्यावेळला तरी तुळा नि श्रिमा यक, बाळू, शंकर वा बापू बरोबर यावे लागेल. हे आतांच सांगून ठेवितो.

आगबोटीचे चित्र व त्याचे थोडेसे वर्णन या पत्रासोबत मी पाठवीत आहे, ते पहा. माझी रोजची डायरी, मुंबईपासून मी ठेविली आहे, ती लंडनहून सविस्तर पाठवून देईन. त्यांत सर्व कांहीं लिहिले आहे म्हणून यापत्रांत विशेष कांहीं लिहीत नाहीं. आणि मी वर्तमानपत्रांतून लेखही प्रसिद्ध करणार असून ते तुम्हांला वाचावयाला मिळतीलच. माझ्या [खो]लीत सर्व हिंदुस्थानांतीलच लोकं असल्यामुळें मला विशेष [त्रा]स पडत नाहीं. बोटीवर आम्हीं हाताने करणार होतो [म्ह]णून डाळ, तांदूळ, मुंबईहून घातली परंतु स्वयंपाकास जागा [नस]ल्यामुळें आम्हांला त्यांच्याच हातचे अन्न खावें लागते [प्र]त्येक दिवसाला एकेकाला १॥ रुपया घेतात आणि बटाटे रोट- लोणी व कॉफी इतके पदार्थ जेवावयाला देतात. आज सहा दिवस दोन्ही वेळ आम्ही हेच पदार्थ खात आहों. मधल्या वेळी डिंकाचे लाडू, वड्या, शंकरपाळी वगैरे खाऊन दिवस काढले. मला एकच दिवस बोट लागली व एकदांच ओकलो. स्नान समुद्राचे पाण्याने प्रथम करून नंतर दोन चार (तांब्ये) गोडे पाणी घ्यावे लागते. नित्य स्नान होते येथें मात्र 'लाजाचे आधी' मला खावे लागले. निरुपाय झाला. अ.सौ. चि. अरविंद व बिपीन यांची प्रकृती संभाळ. सर्वांना आशिर्वाद. ति. गं. वहिनींना शि. सा. नमस्कार. तुझा अण्णा

तूं अनेक वाचन वाढीव, लिहिणे कर इंग्रजीत तुझें काम केल्यासारखे होऊन तुमच्याला अत्यंत प्रिय होशील. ८५

~~८५~~ 56. Bombay Girgaum
18th Nov. 1913

चि. [illegible] यांस अनेक आशीर्वाद

[illegible] दोन [illegible] [illegible] फुरसत [illegible] [illegible] आहे [illegible]

[illegible] २०० [illegible] [illegible] आहेत [illegible]

[illegible] आहे [illegible]

[illegible] आहेत [illegible]

[illegible]

~~46~~56

INDIA POST CARD

INDIA POSTAGE

BOMBAY ... 13 P.M.

WRITING SPACE

[illegible]

ADDRESS ONLY

HUBLI 20 NOV 13

[illegible]

Hubli

S. M. C.

३५७

Dr.
N. S. Hardikar
M. C. P. & S.

~~Hubli~~
मार्सेल नजीकच्या दर्यात.
Dated. ४ - डिसेंबर 1913.
प्रातःकाळ.

To चि. रामूस अनेक आशीर्वाद :-

मी मुंबईस तुझी रजा घेतल्याला आज बरोबर Sir, १६ दिवस झाले. आज मी माझ्या सर्व मालासह हिंदकालिका बरोबर घेऊन युरोपांतील फ्रान्स देशाच्या किनाऱ्यावर उतरणार आहे. आणि तेथें रात्री ८॥ वाजतां आग गाडी पकडून उद्यां तारीख ५ रोजीं ११ वाजतां जेवणाच्या वेळेला पारीस शहरास जाणार! हें शहर पहावयाला बरेच दिवस लागतात, पण मला दिवस खर्च करावयाचे नाहींत म्हणून फक्त तारीख ६ व ७ हे दोन दिवस त्या ठिकाणी घालवून तारीख ८ला सोमवारीं प्रातःकाळीं लंडन शहरास पोहोंचणार। असा कार्यक्रम ठरविला आहे.

रामु, मुंबईतील पांचच दिवसाच्या अवधीत तुला आमच्या बरोबर असलेल्या मंडळीचा उत्साह कळून आला असेल. प्रत्येक गोष्ट मला स्वतःला करावी लागत असून पैसा, सामान, मुलांचें धोरण, किंबहुना सर्वांचा प्राण यांची मला रात्रंदिवस काळजी करावी लागते. आणि तेणेकरून मला सौख्य कधींही मिळत नाहीं. मुंबईतील गडबडीमुळें आम्हीं विशेष कांहीं विसरलो असें नाहीं तर पुष्कळ सामान घ्यावयाचें सोडलें. वाडगीरचा ओव्हरकोट, बिस्किटाचे डबे, फळफळावळ, कांहीं पका मेवा इत्यादी घ्यावयाचा पाहिजे होते परंतु मनाच्या अस्वस्थतेमुळें मला कांहींच सुचलें नाहीं. म्हणून आगबोटीवर थोडी पंचाईत पडली.

जातांना मी काय काय करेन हें वेळोवेळीं तुला कळतच जाईल.
M58 राघु, निघावयाच्या दिवशीं तुझ्याशी जर मी नीट
बोलले नसेन तर मला क्षमा कर. मी मुद्दाम बोलले नाहीं
असें नसून वर सांगितलेल्या अनेक कारणामुळें बोलले नाहीं.
मी सर्वस्वी तुझा आहे. तू माझे हे यापूर्वीचे सर्व अपराध
क्षमा कर आणि पुढें अत्यंत प्रेमानें — जगांत ~~कसा~~ प्रेमाचें
अस्तित्वच नसलें पाहिजे — आपण वागूंया. आजपर्यंत
कितीदां तरी तूं माझ्यावर रागावला असशील, किती एकदां
तरी मला नाहीं नाहीं ती दूषणें दिलीं असशील पण तें आतां
सोड आणि पूर्वीचा राघू व पूर्वीचा नारायण ही रूपें टाकून
आपण नवीन तेजःपुंज रूपें धारण करूं या, आणि या जगांत
काय आहे तें लोकांच्या निदर्शनास आणूं या.

नाडगीर यांस नको नको म्हणत असतांना सुद्धां मी
परदेशास घेऊन जात आहे. एवढेंच नव्हे तर कांहीं एक
सुद्धां येत नसलेला मुंबईतील सोबतीदार निकाळकर यांसही
मी गळ्यांत घालून घेतलें हें पाहून तुम्हांला आश्चर्य वाटलें
असेल. पण तसें करण्याचें बिलकूल कारण नाहीं. कां, कीं,
आपले हिंदु लोक जितके हिंडतील, फिरतील तितके थोडे
असून, त्यांना आपली उन्नतावस्था करून घ्यावयाचा मार्ग
हाच एक आहे कारण या योगें अनुभव माहीत होऊन परकी
लोकांत व आपणांत काय काय फरक आहेत हें कळू लागतात
असें मला वाटत असल्यामुळें मला याप्रमाणें करावें लागलें.
बाहेर जाणारे मूर्ख, अकल शून्य जरी असले तरी पत्करलें पण
त्यांना बाहेर काढून अमुक अमुक मार्गानें जा म्हणून सांगितलें
म्हणजे बरीच कामें होतात. इतकेंच कीं मार्गदर्शक ठेवावा
लागतो. तो नसेल तर मात्र परदेशांत यांचें मरणच.
नाडगीरचा मार्गदर्शक मी असून गोविंदाबरोबर तोही किती
व कसा पुढें होईल याचें लोकांला परत गेल्यानंतर उदाहरण

४ होईल. बाकी या दोघांवर अमेरिकेस गेल्यानंतर मी निर-
निराळीं कामें सोंपविणार असून त्यांच्यावर थोडथोडी जबा-
बदारी टाकणार आहे. वेळोवेळीं तुला कळवत राहीन.

राघराय! तुला एक विनंती, अंतःकरणपूर्वक तुला एक
विनंती करितों ती ही कीं तूं आपला हमरी तुमरीचा स्वभाव
काढून टाक. आज सर्व मुलांबाळांशी हसून वागत जा.
असें करण्यांत तुझा जितका फायदा आहे तितका दुसरा
कशांतही नाहीं हें तूं ध्यानांत आण. आपल्या मंगूताईला
लक्ष देऊन तिला प्रत्येक गोष्टींत संतोषवीत जा. तिला या
जगांत घरकोंबड्याप्रमाणें एकटीलाच कंटाळवाणें, दुसऱ्याचा
दास बनून राहावें लागणार आहे. तर कृपाकर तिला लाग-
तील तितके पैसे दे. कांकूं करूं नको. तिलाच पैसे, तिला
अशारीतीनें तरी खर्च करूं दे. अशारीतीनें तरी आराम वाटूं
दे. आतां पैसे खर्च झाले तर पुढें काय याची काळजी नको
कारण ज्यानें जन्माला घातलें तो कांहीं तरी व्यवस्था करील.
मंगूताईसारख्या एवढ्याशा बाळेला जर ब्रह्मचर्य व्रतानें या
जगांत दिवस काढणें अवश्य आहे तर मलाही काढता आले
पाहिजेत अशा तऱ्हेनें माझें मन तयार झालें आहे. आणि
तिच्या सुखाकरितां मी आपला प्राण — तिच्याच नव्हे तर
रंडकेल्या गांजलेल्या सर्व लोकांकरितां आपला प्राण — देण्यास
तयार आहे, तर मंगूताईच्या पुढील आयुष्याकरितां पैशा-
ची काळजी सोडून दे. आम्ही दोघेही (तूं व मी) पुढें आहोंतच
पण आतां तिला लागेल त्याला पैसा दे; (बाहेर कामाला
खर्च करूं नको म्हणजे झालें) हिशेब ठेवून ठेवावयाला सांग
तिला स्वतःची (दुकानातून नको) पुस्तकें आणून दे आणि
तिच्याकरितां एखादें मासिक सुरू कर. एवढी मला भिक्षा
घाल. मी पदर पसरून तुझ्याजवळ मागणी करीत आहे.

दुसरें दर आठवड्यास गुरुवारच्या गुरुवारी ~~आ~~
तूं सर्वांकडून पत्रें घेऊन मला पाठवीत जा. माझा पत्ता

2

राजभाऊ, अशा स्थितीत मी मुंबई शहर सोडले. बंदरावर
तुम्ही सर्व जण आला होता, फोटो घेतलात, मजा केलीत, तुम्ही
सर्व जण बोटीत बसून बोटी जवळ आलात इतके सगळे चालले
असताना मला कोणाशीही शांतपणे बोलावयाला सुचले
नाहीं. याचे कारण मनाला झालेला भयंकर त्रास. एक
तर कंदीकर मेले अशी तार आलेली. या तारेने मला
सुचविले कीं पुढा पुढें मदत मिळणार नाहीं. कारण याच
पुरुषाने पुढें सहाय्य करण्याचे अभिवचन दिले होते. दुसरे
तुम्हां सर्वांचा वियोग. गावात बसलेल्या तुम्हां सर्वांचा निरोप
घेताना मी कितीही शांतपणा व धैर्य दाखविले तरीसुद्धां
मला अंतरात फार त्रास होत होता. कसा तरी सर्वांचा
निरोप घेतला पण तुझा निरोप कसा घेतला हें माझे मला
कळले नाहीं. "तुझा पिता जाय" "तात्याकडे आहे तो तुला
देईल" एवढे उद्गार काढल्याचे मला स्मरते फक्त तुम्ही
बाबा पावती झाली. मोडक, गोविंदराव पंडीत, कमलदानी
वगैरे मी 'दुःख करूं नको, कसें तरी होईल' असें ज्यावेळेला
सांगितले त्यावेळेला Remember, It is a lion heart
एवढे सर्वांना उद्देशून सांगितले व सिंधूस जगताईला
सर्व मजकूर लिहिल्याबद्दल सांगून हरिभाऊस विनायकाला
पार करण्याला कळविले एवढें मात्र मला स्मरते. राजू,
खरोखरी हा सिंहाचा बच्चा आहे असें तूं समज, तो
आजपर्यंत कशालाही डगमगला नाहीं आणि पुढें तो कोणाला
डरणार नाहीं. याचा जनक कष्ट करितां असून त्याला ती सहन
करावी लागणारच. पण त्याला एकाची अपेक्षा आहे. आणि
